# राष्ट्रीय सेवा योजना
# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक,
**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,**
उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित उपक्रम अहवाल

## मार्च २०२०

## शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०

१. मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक, कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक – ४२२००८
२. प्राचार्य डॉ. जे.डी.सोनखासकार , मो.९४२२२५६७५८
३. कार्यक्रम अधिकारी प्रा आर.ए.वटणे , मो.९८८१९७८१०९
४. स्वयंसेवक एकूण संख्या (एकूण युनिट)- २५० दोनशे पन्नास
५. कार्यशाळा शिबीर व्याख्याने इ. आयोजनात सहभागी संस्था
    १. नंदिनी संवर्धन मोहीम नाशिक
    २. ग्रामपंचायत गिरणारे
    ३. जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग नाशिक
    ४. यश फाउंडेशन नाशिक

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**
**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,**
**उत्तमनगर सिडको, नाशिक- ४२२००८**

---

# नियमित उपक्रम अहवाल २०१९-२०२०

**माहे जूलै २०१९ –**

१ ते ७ जुलै २०१९ या कालावधीत महाविद्यालय परिसरात वन महोत्सव साजरा करण्यात आला महाविद्यालय परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. या आठवड्यात महाविद्यालयातील परिसरात वृक्षरोपण करण्यात आले यात ६० वेगळ्या प्रजातीच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ च्या राष्ट्रीय सेवा योजना च्या वतीने आयोजित स्वच्छ वारी – स्वस्थ वारी - निर्मल वारी – निसर्ग वारी पुणे ते पंढरपूर २३ जून ते १५ जुलै २०१९ आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमात महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने एक विद्यार्थिनी स्वयंसेविका सहभागी झाल्या प्रतिक्षा आंधळे हिने या उपक्रमात सहभागी होऊन उत्तम प्रतिनिधित्व करत २१ दिवस कृतीशील सहभाग दर्शवला.






दि. ११/०७/२०१९ रोजी महाविद्यालयामध्ये तंबाखू व्यसनमुक्तीसाठी सामुहिक शपथ घेण्यात आली.

आणि जागतिक लोकसंख्या दिनाविषयी स्वयंसेवकांना माहिती देण्यात आली.

**माहे ऑगस्ट २०१९ –**

दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत महाविद्यालयातील 'स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान पंधरवाडा' साजरा करण्यात आला या पंधरवाड्या निमित्त महाविद्यालयात तसेच महाविद्यालयीन परिसरात वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये स्वच्छतेच्या शपथेने पंधरवड्यातील उपक्रमास सुरुवात करण्यात आली तर पुढे महविद्यालयातील परिसरातील स्वच्छता मोहीम त्यांतर्गत सिडको परिसरातील राजे छत्रपती संभाजी क्रीडा संकुलात श्रमदान करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय योजनेचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच या पंधरवड्यात महाविद्यालयीन परिसरात स्वच्छता जनजागृती पर रॅली काढण्यात आली, परिसरातील झोपडपट्टीमध्ये येथे प्रत्यक्षात जावून स्वच्छता पर जनजागृती स्वच्छता सर्वेक्षण इत्यादी उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमात रा.से.योजनेचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदविला, तसेच महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्यांनी स्वच्छता अभियानासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.





दि. २२/०८/२०१९ ते २८/०८/२०१९ या कालावधीत पार पडलेल्या आपत्ती व्यवस्थापन शिबीर( कोल्हापूर-सांगली पूरग्रस्त पुनर्वसन) कोल्हापूर येथे महाविद्यालयातील रुचिका महाजन, काजल भरीत  ललनी महाजन, नीलम पाटील चार स्वयंसेविका सहभागी झाला होत्या.

दि. ३१ ऑगस्ट ते SRD-NRD जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबिर पुणे येथे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील कल्पेश नाथ, भारती पाटील, तृप्ती पवार, प्रांजल निकुंभ या स्वयंसेवकानी सहभाग नोंदविला.

**माहे सप्टेंबर २०१९ –**

दि. ०५/०९/२०१९ SRD-NRD विद्यापीठस्तरीय निवड चाचणी शिबिर पुणे येथे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील कल्पेश नाथ, भारती पाटील, तृप्ती पवार, प्रांजल निकुंभ या स्वयंसेवकानी सहभाग नोंदविला.

दि.१४/०९/२०१९ ते १६/०९/२०१९  रोजी कल्पेश नाथ, भारती पाटील, तृप्ती पवार यांनी राज्यस्तरीय SRD-NRD निवड चाचणी शिबीर औरंगाबाद येथे सहभाग नोंदविला.

दि. १२ सप्टेंबर २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने नाशिक महानगरपालिका आयोजित 'गणेश मूर्ती दान' या उपक्रमात सहभाग नोंदवून गणेश विसर्जनाच्या दिवशी गणेश मूर्तींचे विसर्जन न करता ती दान करावी पर्यावरणाच्या संवर्धन करावे. याची जनजागृती करत, गणेश मूर्ती संकलनामध्ये रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व स्वयंसेवकांनी दर वर्षी प्रमाणे आपले योगदान दिले. या उपक्रमामध्ये महाविद्यालय सातत्याने उत्कृष्ट काम करते.





२४ सप्टेंबर २०१९ ते २ ऑक्टोबर २०१९ या दरम्यान राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त स्वच्छता हीच सेवा या उपक्रम अंतर्गत महाविद्यालयात विविध कार्याक्रमचे आयोजन करण्यात आले. त्या राष्ट्रीय सेवा योजनाच्या वतीने स्वच्छता जनजागृती, प्लास्टिक मुक्त भारत, निरोगी भारत त्याचा बरोबर नंदिनी नदी परिसरात जाऊन स्वच्छता मोहीम राबविण्यात आली या प्रसंगी नाशिक महानगरपालिका, गोदा संवर्धन मोहीम च्या कार्यकर्त्यांनी या उपक्रमामध्ये सहभागी होऊन हातभार लावला.





दि. २४ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयात रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. प्रशांत टोपे (समन्वयक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उपकेंद्र नाशिक) यांना आमंत्रित करण्यात आले होते त्यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.







दि. २७/०९/२०१९ रोजी रासेयो वार्षिक नियोजन सभा महाविद्यालयात आयोजित करण्यात आली प्रसंगी डॉ.प्रभाकर देसाई कार्याक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते प्राचार्या डॉ. जे.डी.सोनखासकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.







तसेच या कार्यक्रमात स्वयंसेवकांना या वर्षभरातील उपक्रमा विषयी माहिती देण्यात आली. नवीन सहभागी स्वयंसेवकांचे स्वागत करण्यात आले त्याच बरोबर रा.से.योजनेच्या डायरी व बॅजेस चे वाटप करण्यात आले.

**माहे ऑक्टोबर २०१९ –**

२ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधीजींची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली, या प्रसंगी सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी महाविद्यालयातील विभाग, वर्गखोल्या, सेमिनार हॉल, पार्किंग व इतर परिसराची स्वच्छता करण्यात आली.

दि. ०४/१०/२०१९ रोजी महाविद्यालयात एक दिवशीय तंबाखू मुक्त भारत कार्यशाळा आयोजित करण्यात आली त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.अतुल साळुंखे ( राज्य संपर्क अधिकारी मंत्रालय कक्ष रासेयो मुंबई) डॉ. प्रभाकर देसाई ( संचालक रासेयो सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे) डॉ. डी डी. काजळे ( शिक्षणाधिकारी म.वि.प्रा. समाज नाशिक ) कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. नानासाहेब महाले ( संचालक म.वि.प्रा. समाज नाशिक) आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे.डी.सोनखासकर या उपस्थित होत्या. तर जिल्हा समन्वयक प्रा. रवींद्र अहिरे यांनी संपूर्ण कार्याक्रमचे आयोजन केले.






**माहे नोव्हेंबर २०१९ –**

दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी महाविद्यालात 'संविधान दिन' साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. सोनखासकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षीय पद भूषविले व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**माहे डिसेंबर २०१९ –**

दि: ०७/१२/२०१९ ते १३/१२/२०१९ या कालावधीत संविधान सन्मान सप्ताह साजरा करण्यात आला, या सप्ताहामध्ये निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, सामुहिक संविधान वाचन, व्याख्याने आयोजित करण्यात आली, मोठ्या उत्साहात हा सप्ताह महविद्यालयात साजरा करण्यात आला.






०२ डिसेंबर रोजी जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग नाशिक यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या रॅली मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी सहभाग नोंदवत एड्स रोगाविषयी जनजागृती केली.






**माहे जानेवारी २०२०  –**

दि. ०२ जाने ते ०८ जाने दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले त्यात १२५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. विविध उपक्रमांच्या माध्यमातून या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन पार पडले व ०८ जाने रोजी समारोप करण्यात आला.

दि. १२ जानेवारी ते ३० जानेवारी दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात 'युवा सप्ताह' चे आयोजन करण्यात आले, युवा सप्ताहाची सुरुवात १२ जानेवारी युवा दिना निमित्त महाविद्यालय परिसर, वर्ग खोल्या, बाथरूम्स, विषय विभाग यांची महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व इतर कर्मचारी तसेच स्वयंसेवक यांनी स्वच्छता केली तसेच विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, काव्य वाचन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसमेलानाचे आयोजन करण्यात आले व शेवटच्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित अर्चनाताई भोसले, सीताबाई मोहिते यांच्या हस्ते वर्ष भरतील विविध स्पर्धेत विजेते व सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

दि १६/०१/२०२० ते २६/०१/२०२० या कालावधीत कालिना, मुंबई State Republic Day परेड साठी कु. भारती पाटील हिची निवड होऊन तिने या परेड मध्ये सहभाग नोंदविला.

दि. १२/०१/२०२० ते १६/०१/२०२० लखनौ येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय युवा मोह्त्स्वात महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु.ललनी पंकज महाजन हिने सहभाग नोंदविला.

दि. १४/०१/२०२० सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ पुणे येथे संपन्न झालेल्या उत्कर्ष शिबीर निवड चाचणी साठी आकांक्षा देवरे, निशांत काकडे आणि तृप्ती पवार या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दि. २५ जानेवारी २०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयात मतदार साक्षरता दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून आलेले श्री. संजय भामरे यांना मतदार साक्षरता जनजागृती वर व्याख्यान दिले.






दि. २६/०१/२०२० रोजी आई फौंडेशन च्या वतीने घेण्यात आलेल्या Flash Mob Dance साठी महविद्यालयातील ३२ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

दि. २८/०१/२०२० ते ०३/०२/२०२० राज्यस्तरीय गिर्यारोहण शिबीर चिखलदरा अमरावती येथे महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे यांनी सहभाग नोंदविला.

**माहे फेब्रुवारी २०२० –**

दि. ०२/०२/२०२० ते ०८/०२/२०२० भागडी, भंडारा येथे राज्यस्तरीय विशेष शिबीर येथे संपन्न झाले यात विशाल पाटील, राहुल चौधरी या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

२३ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयात संत गाडगे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रसंगी प्रा.सोमनाथ घुले सर यांनी संत गाडगे महाराज यांच्या विषयी माहिती सांगितली.

दि २४/०२/२०२० रोजी आई फौंडेशन च्या वतीने घेण्यात आलेल्या काव्यवाचन स्पर्धेत विशाल पाटील, भारती पाटील, जयश्री पवार यांनी सहभाग नोंदविला.

**माहे मार्च २०२० –**

दि. ०६/०३/२०२० रोजी महाविद्यालयात वसंतराव पवार मेडीकल कॉलेज च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले त्या ३३ स्वयंसेवकांनी रक्तदान केले.






०७ मार्च २०२० रोजी 'जागतिक महिला दिन्नानिमित्त' महाविद्यालयात मनकर्णिका पुरस्कार देऊन सामाजिक क्षेत्रात कार्यरत ५ महिला आणि महविद्यालयात गरीब परिस्थितून शिक्षण घेत असलेल्या २६ विद्यार्थीनीना पुरस्काराने गौरविण्यात आले.





राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे वर्षभर आयोजित या नियमित कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग जिल्हा समन्वयक प्रा. रवींद्र अहिरे, कार्यक्रम अधिकारी प्रा.रविराज वटणे प्रा. वर्षा शिरोरे यांनी उत्सफुर्तपणे सहभाग घेतला तसेच प्रा. सोमनाथ घुले सरांचे विशेष मार्गदर्शन लाभले, या सर्व नियमित कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्या डॉ. जे.डी.सोनखासकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच स्वयंसेवकांच्या उत्तम प्रतिसादामुळे सन २०१९-२०२० वर्षातील सर्व नियमित कार्यक्रम उत्तमरीतीने पार पडले.

हिमोग्लोबिन तपासणी एकूण सहभागी संख्या- २१०
वृक्षरोपण एकूण संख्या- ३५८
रक्त दान केल्यालयांची संख्या – ७३
सहभागी स्वयंसेवक- २५०

**(प्रा.रविराज वटणे )**
**रा.से.यो**
**कार्यक्रम अधिकारी**

(डॉ. जे.डी.सोनखासकर)
**प्राचार्य**